# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

( निवडणूक शाखा )



| वेबसाईट : www.nwcmc.gov.in | जा.क्र. नांवाशमनपा/निवड/ 167/2017 |
|---|---|
| ई-मेल : info@nwcmc.gov.in, election@nwcmc.gov.in | दिनांक : 8/9/2017 |
| दुरध्वनी क्र. 02462-233625, 234405, 235710 | फॅक्स क्र. 02462-232071 |



"निवडणूक प्राधान्य"

प्रति,

मा.पोलिस अधिक्षक,

नांदेड.

विषय:- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017
विविध पथके गठीत करण्यासाठी पोलीस कर्मचा-यांची नावासह यादी पाठविणे बाबत.

संदर्भ:- 1. राज्य निवडणुक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/मनपा/2017/प्रक्र-47/का-5, दि.21.07.2017.

2. मा. राज्य निवडणूक आयुक्त, यांचे कडील निवडणूक कार्यक्रम ई-मेल पत्र क्र.रानिआ/मनपा/2017/ प्र.क्र.47/ का.5 दि.06 सप्टेंबर 2017.

महोदय

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भिय क्रं. 2 च्या आदेशान्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017 चा कार्यक्रम घोषित केलेला आहे. त्यानुसार दिनांक 06.09.2017 पासुन आदर्श आचारसंहिता लागु झालेली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भिय क्रं. 01 च्या आदेशान्वये आचारसंहितेच्या काळात खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी वस्तुंच्या वाटपावर अंकुश ठेवणे, पैश्याची व मद्याची अवैद्य मार्गाने वाहतुक तसेच महापालिका क्षेत्रातील महत्वाचे नाके तपासण्यासाठी चेकपोस्ट तयार करणे यासाठी पथक निर्माण करण्यास राज्य निवडणूक आयोगाचे आदेश व निर्देश आहेत. सदर आदेशाची प्रत यासोबत सादर करण्यात येत आहे.

करीता महापालिका निवडणूकीसाठी (07) निवडणूक निर्णय अधिकारी व (01) आचारसंहिता पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार खालीलप्रमाणे पथक गठीत करणे आवश्यक आहे.

1. व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक (Video Surveillance Team) - 08 पथक
2. भरारी पथक ( Flying Squad) - 08 पथक
3. चेक पोस्टासाठी पथक ( Statistic Surveillance Team) - 06 पथक

उक्त प्रत्येक पथकामध्ये महापालिकेतील कर्मचारी / व्हिडिओग्राफर तसेच दोन पोलीस कर्मचारी नियुक्ती करुन पथके तात्काळ गठीत करणे आवश्यक आहे. उक्त समिती गठीत करण्यास पथकानुसार पोलीस कर्मचारी नियुक्ती करुन यादी या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था व्हावी अशी विनंती आहे.

स्वा-

निवडणूक अधिकारी तथा आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रतिलिपी माहितीस्त्व व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

1) मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई
2) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड.

8/9/17.

निवडणूक अधिकारी तथा आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड करिता.